**पुणे विद्यापीठ**
**गणेशखिंड, पुणे-४११००७.**


दूरध्वनी क्र.०२० - २५६०१२०४
प्रति. - २५६०१२७९
मेकेन/सी/वि.वा. - २५६०१२७६
आर्टस - २५६०१२७३
सायन्स-२५६०१२७४/कॉमर्स-२५६०१२७५
फार्मसी/मेडिकल - २५६०१२८०

परीक्षा विभाग
टेलिग्राम : "युनिपुणे"
फॅक्स - ०२० - २५६०१२०४
फॅक्स - ०२० - २५६०१२०८
वेबसाईट:www.unipune.ernet.in
वेबसाईट:www.unipune.ac.in
ई-मेल : coe@unipune.ernet.in


संदर्भ: परीक्षा/बी.एस्सी (संगणक)/ १०२e

दि. १३/०७/२०१० १४

मा. प्राचार्य,
सर्व संलग्न बी.एस्सी.(संगणक) महाविद्यालये

विषय:— ऑक्टोंबर २०१० मधील बी.एस्सी.(संगणक) परीक्षा अर्ज भरण्याबाबत...

महोदय,

वरील विषयासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की,ऑक्टोंबर २०१० मधील बी.एस्सी.(संगणक) परीक्षेचे परीक्षा अर्ज विद्यार्थ्यांकडून भरुन घेताना खालीलबाबी विद्यार्थ्यांच्या नजरेस आणून देण्यात याव्यात व त्याचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१. प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष (संगणक) सेमिस्टर — १ या जुन्या अभ्यासक्रमाची परीक्षा एप्रिल २०१० मध्ये संपल्याने नवीन अभ्यासक्रमामधील समकक्ष विषय विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्जामध्ये भरावेत
२. द्वितीय वर्ष (संगणक) सेमिस्टर — २ व तृतीय वर्ष (संगणक) सेमिस्टर —३ जुन्या अभ्यासक्रमाचा परीक्षा अर्ज विद्यार्थ्यांनी जुन्या अभ्यासक्रमानुसारच भरावा. **(BackLog)**
३. तृतीय वर्षास (संगणक) नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी नवीन अभ्यासक्रमाचा परीक्षा अर्ज भरावा.
४. तृतीय वर्षास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा द्वितीय वर्ष सेमिस्टर — २च्या परीक्षेचा बॅकलॉग असेल तर (काही विषय अनुत्तीर्ण असेल तर ) अशा विद्यार्थ्यांनी द्वितीय वर्ष सेमिस्टर—२ जुन्या अभ्यासक्रमाचा परीक्षा अर्ज भरावा तसेच तृतीय वर्षासाठी नवीन अभ्यासक्रमाचा परीक्षा अर्ज भरावा व महाविद्यालयाने असे भरलेले दोन्हीं परीक्षा अर्ज एकत्र करुन विद्यापीठाकडे पाठवावेत,
५. जुना अभ्यासक्रम परीक्षा अर्ज, नवीन अभ्यासक्रम परीक्षा अर्ज व एकत्रित अभ्यासक्रमाच्या परीक्षा अर्जांचे वेगवेगळे ५०—५० चे गठ्ठे करुन विद्यापीठाकडे पाठविण्यात यावेत.

तरी वरीलप्रमाणे विद्यार्थ्यांना स्पष्ट माहिती देऊन हया प्रमाणे परीक्षा अर्ज भरुन घेऊन विद्यापीठात सादर करावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
(परीक्षा)